**प्रेस नोट**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार, दिनांक २१.०९.२०२६

| अ.क्र. | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| १ | घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार |
| २ | तक्रारदार | पुरुष, वय ४८ वर्षे |
| ३ | आरोपी | १. गिरीश नान्या मावची, वय ५२ वर्षे, नेमणूक– पोलीस पाटील, बिलमांजरे, ता.नवापूर, जि.नंदुरबार<br>२. कांतीलाल रुळजी गावीत, वय ४८ वर्षे, खाजगी इसम रा.आमपाडा ता. नवापुर जि नंदुरबार |
| ४ | तक्रार | यातील मूळ तक्रारदार यांचा मुलगा सायबर कॅफेमध्ये काम करीत असून सदर ठिकाणी महिला, वय २३ वर्षे ही तिच्या कामानिमित्त आली असता त्यांची आपसांत ओळख झाली होती. त्यानंतर मागील ०३ महिन्यांपासून त्यांचे एकमेकांशी मोबाईल फोनवर बोलणे, व्हॉटसअॅप कॉल, मेसेज करणे सुरु होते. सदर बाब महिलेच्या पतीस माहिती झाल्यावर महिला व तिचा पती यांचे आपसांत वाद झाले. त्यानंतर महिलेच्या पतीने आरोपी क्र.१ यांना तक्रारदार यांचे मुलाविरुद्ध पोलीसांत तक्रार करायची असल्याचे सांगितले. आरोपी क्र.१ व २ यांनी तक्रारदार यांना त्यांचे मुलाची पोलीसात तक्रार होवू न देता प्रकरणा मिटवून देण्यासाठी तक्रारादाराकडे ७०,०००/– ची मागणी केली व त्यापैकी ३०,००० रु दिनांक २९/०८/२०२६ रोजी तक्रारदाराकडून स्विकारले व उर्वरीत ४०,०००/– रु. लाचेची मागणी करीत असल्याने व तक्रारादारास सदर लाच रक्कम आरोपींना द्यायची नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक १५/०९/२०२६ लाप्रवि नंदुरबार घटकाकडे लेखी तक्रार दिली होती. |
| ५ | तक्रारीची पडताळणी | सदर तक्रारीबाबत आरोपी क्र. १ व २ यांची लाच मागणीसंबंधाने दिनांक १५/०९/२०२६ रोजी पडताळणी कारवाई केली असता आरोपी क्र. १ व २ यांनी तक्रारदाराकडे त्याचे मुलावर पोलीस कारवाई होवू न देण्यासाठी ७०,०००/– रु पैकी उर्वरीत ४०,०००/–रु.लाच रकमेची मागणी करुन सदर रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. |
| ६ | सापळा कार्यवाही | दिनांक २१/०९/२०२६ रोजी आरोपी क्र.१ याने आरोपी क्र.२ याचे उपस्थितीत पंचासमक्ष नवापूर शहरातील पशु वैद्यकीय दवाखान्याजवळ सदर लाच रक्कम स्विकारल्याने यशस्वी सापळा कारवाई करण्यात आली आहे. |
| ७ | गुन्हा रजिस्टर नं/कलम/पोलीस स्टेशन/जिल्हा, दिनांक व वेळ | पो.स्टे. नवापूर येथे आरोपीविरुद्ध भ्र.प्र.अधिनियम कलम ७, ७ अ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| ८ | आरोपी अटक दिनांक व वेळ | आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून गुन्हा दाखल होताच अटक करण्यात येते. |
| ९ | सापळा अधिकारी | पो.नि.संदिप पाटील, लाप्रवि, नंदुरबार |
| १० | पर्यवेक्षक अधिकारी | पोउपअधीक्षक, प्रशांत भरते, लाप्रवि, नंदुरबार |
| ११ | सापळा पथक | १.असई/ विलास पाटील    २.पोहवा/विजय ठाकरे<br>३.पोहवा/संदिप खंडारे    ४.पोहवा/नरेंद्र पाटील<br>५.पोहवा/जितेंद्र महाले    ६.पोना/हेंमंतकुमार महाले |
| १२ | मार्गदर्शन | १.श्री.भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक<br>२.श्री.प्रदिप मैराळे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक<br>३.श्रीमती कविता फडतरे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

१३. लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती अगर लाच मागणा–या लोकसेवकाविरुद्ध तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमूद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.

| | घटक कार्यालय | परिक्षेत्र कार्यालय | लप्रवि, मुख्यालय |
|---|---|---|---|
| | १ | २ | ३ |
| पत्ता | लाप्रवि, नंदुरबार,<br>१२, जयचंद नगर, कोरीट रोड,<br>नंदुरबार | पोलीस अधीक्षक<br>लाप्रवि, नाशिक परिक्षेत्र,नाशिक<br>तिबेटीयन मार्केट, मनपा भाजीपाला मार्केटचे वर,<br>शरणपूर रोड, नाशिक | ला.प्र.विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,<br>सर पोचखानवाला मार्ग,<br>वरळी, मुंबई |
| दुरध्वनी क्रमांक व्हॉटस्अॅप क्रमांक | ०२५६४–२३१००९<br>९४२३५४१०६४<br>१०६४ | ०२५३–२५७५६२८<br>९९३०९९७७००<br>१०६४ | ०२२–२४९२१२१२<br>१०६४ |
| ई–मेल आयडी | dyspacbnandurbar@gmail.com | spacbnashik@gmail.com | acbwebmail@mahapolice.gov.in |

प्रशांत भरते
DySP
ACB नंदुरबार